मुखपृष्ठ कथा

तडजोड सार्वभौमत्वाशी?

एजाज अहमद

भारताला मिळालेल्या स्वातंत्र्याचे निर्णायक क्षण/घटना एक नव्हे तर दोन आहेत. त्यातला पहिला म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री वासाहतिक शासकीय व्यवस्थेकडून स्वतंत्र भारताच्या शासनाकडे औपचारिक हस्तांतरण झाले तो मध्यरात्रीचा क्षण. त्या रात्री स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटना परिषदेच्या विशेष सत्रात 'नियतीशी करार' याचा उल्लेख असलेले जे भाषण केले त्याने हा क्षण इतिहासामध्ये नोंदला गेला आहे. परंतु हा क्षण एकसूरी नव्हता. एकीकडे भारताला मिळालेल्या स्वातंत्र्याचा जल्लोष होत होता आणि तर दुसऱ्या बाजूला महात्मा गांधी कोलकात्यामध्ये जातीय दंगलींना रोखण्यात मशगूल होते. ते या स्वातंत्र्याच्या जल्लोषापासून जाणीवपूर्वक दूर होते.

दुसरा ऐतिहासिक क्षण म्हणजे, स्वातंत्र्यानंतरच्या दोन-अडीच वर्षात म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले तो होय. या दिवशी भारतीय नागरिकांना सार्वत्रिक मताधिकार मिळाला. मूलभूत हक्कांचा प्रसार झाला व मार्गदर्शक तत्त्वांची घोषणा झाली. दोनच वर्षांपूर्वी म्हणजे १९४७ साली भारतात अभूतपूर्व स्थिती निर्माण झाली. त्या वर्षी भारत हा एक वासाहतिक देश म्हणून राहिला नव्हता हे खरे असले तरी त्याच वेळी भारताची फाळणी होऊन १/४ लोकांनी आपली घरे सोडली होती. त्याच वेळेस भारतीय स्वातंत्र्यलढ्याने देशाची पारतंत्र्यापासून मुक्तता केली.

वरील या दोन्ही घटना किंवा क्षण एकमेकांस पूरक असून एक म्हणजे भारताचा स्वातंत्र्यलढा आणि दुसरे म्हणजे घटनात्मक शासननिर्मितीचे प्रयत्न यांचे पाव शतकापासून अन्योन्य संबंध आहेत. पहिल्या महायुद्धानंतर म्हणजेच १९२० च्या दशकात भारताच्या भावी संविधानाचा विचार भारतीय स्वातंत्र्यलढ्यातून समोर येत होता. पुढे १९२८ साली संविधानाची मूलतत्त्वे निश्चित करण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या रिपोर्टमध्ये (नेहरू रिपोर्ट) असणाऱ्या मूलतत्त्वांना भारतीय संविधानाच्या अंतिम

ईमेल : aahmad2001@yahoo.com

Scanned by CamScanner

मसुद्यात स्थान देण्यात आले. तसेच या नेहरू रिपोर्टचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे 'भाषेच्या आधारावर प्रांतांची पुनर्रचना करण्याची सूचना मांडली होती. १९३३ साली पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारतासाठी एक प्रातिनिधिक अशी घटना समिती असावी जी सार्वजनिक मताधिकारातून निवडली गेली असावी अशी बाजू मांडली.

घटना समितीतील स्थिती

घटना समिती ही काही वर्षे काँग्रेसला मागण्या मांडण्यासाठीचे एक व्यासपीठ ठरले. १९३५ चा भारत सरकारविषयक अधिनियम झाल्यानंतर १९३७ साली प्रांतिक कायदेमंडळासाठी निवडणुका पार पडल्या. अनेक प्रांतांमध्ये काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. ज्या प्रांतात काँग्रेसची मंत्रिमंडळे होती अशा प्रांतिक सरकारकडून 'ब्रिटिशांनी हा कायदा मागे घ्यावा आणि घटना समितीकडूनही घटनेचा मसुदा तयार करण्यात यावा' असे ठराव संमत केले. पुढे शेवटी ब्रिटिश कॅबिनेट मिशनने हा ठराव मान्यसुद्धा केला. परंतु घटना समिती ही सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराद्वारे निवडणे अव्यवहार्य ठरेल म्हणून ही मागणी अमान्य केली. ब्रिटिश कॅबिनेट मिशनने गुंतागुंतीची व तांत्रिक अडचणीची ठरेल अशी योजना मांडली. वर्तमान प्रांतिक सरकारमधून प्रातिनिधिक स्वरूपात घटना समितीवरील सदस्यांची निवड करावी व दुसरे म्हणजे मुस्लिम व शीख यांच्यासाठी राखीव मतदारसंघांची निर्मिती करून त्यांना घटना समितीवर सदस्यत्व देण्यात यावे. याला जोडूनच पंडित नेहरू यांचा असा आग्रह होता की, ब्रिटिशांनी प्रथम भारताला स्वातंत्र्य द्यावे आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराने घटना समितीची निर्मिती करण्यात यावी. दुसऱ्या बाजूला महात्मा गांधी यांनी असे म्हटले होते की, 'स्वातंत्र्याच्या बाबतीत तडजोड करण्यापूर्वी घटना समितीचे निश्चितच स्वागत करण्यात येईल.' याच वेळी काँग्रेसने कॅबिनेट मिशनच्या शिफारशींवर नापसंती नोंदवली तर दुसऱ्या बाजूला कॅबिनेट मिशनच्या तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी कामही सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तात्पर्य, सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराशिवाय काम सुरू करण्याच्या निर्णयामुळे वासाहतिक सत्ता ही अधिकच वरचढ ठरत होती. कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणे घटना समितीच्या निवडणुका होऊन मुस्लिम लीगला ७३ जागा मिळाल्या. परंतु मुस्लिम लीगने घटना समितीबद्दल अनेक आक्षेपांची शृंखलाच उचलून धरली आणि पुढे घटना समितीत सहभाग न घेण्याचा निर्णय घेतला.

काँग्रेसने मुस्लिम लीगशिवाय घटनेचा मसुदा तयार करण्याचा निर्णय घेतला. ९ डिसेंबर १९४६ पासून घटना समितीच्या परिषदेचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. पंडित नेहरूंनी घटना समितीपुढे उद्दिष्टांचा ठराव मांडला व हा ठराव जानेवारी १९४७ ला मान्य करण्यात आला. वस्तुतः काँग्रेसमध्ये राखीव मुस्लिम मतदारसंघातील चार सदस्य हे मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करत होते. परंतु ते मुस्लिम लीगच्या ७३ सदस्यांपैकी एकही नव्हते. मुस्लिम लीगच्या घटना समितीत सहभागी न होण्याच्या निर्णयाचा परिणाम हा देशाच्या फाळणीत झाला.

घटना समिती कशी अस्तित्वात आली हे समजून घेण्यासाठी वरील ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. वासाहतिक कॅबिनेट मिशनची योजना ही आठ महिन्यांच्या आत अस्तित्वात आली. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराशिवाय वासाहतिक सत्तेच्या छत्रछायेखाली घटना समितीच्या निवडणुका झाल्या व सदस्यही निवडले गेले. या निवडणुकीत लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ १५ टक्के लोकांना मताधिकार हा त्यांची संपत्ती, शिक्षणाच्या अटींवर देण्यात आला होता. या अटींचा सरळ सरळ असा अर्थ निघू शकतो की, भारतातील इतर सामाजिक किंवा राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या व्यक्तींची निवड होणे किंवा त्यांनी निवडून देणे हे योग्य नाही.

एकपक्षीय घटना समिती

मुस्लिम लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकल्यामुळे स्वाभाविकच घटना समिती ही एकपक्षीय राहिली आणि घटनासमितीतील विचार व मतांतील भिन्नत्व हे केवळ काँग्रेसमधील डावे व उजवे यांच्यापुरतेच मर्यादित राहिले. काँग्रेसमधील डाव्यांचा गट संख्येने जरी लहान असला तरी नेहरूंमुळे त्यांचा प्रभावही घटनासमितीत जाणवतही होता. संविधानाच्या चौथ्या विभागातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांवर डाव्यांचा निश्चित असा प्रभाव दिसून येतो. तसेच म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा प्रभाव हा संविधानावर विशेषतः घटनेच्या तिसऱ्या भागात अधिक दिसून येतो.

एक दीर्घ परंपरा

अनेक कायदेपंडितांमुळे घटनासमितीला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. पंडित नेहरू व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभावही घटनासमितीवर दिसून येतो. परंतु सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या इतर कायदेपंडितांचा, व्यक्तींचा व विविध देशांच्या राज्यघटनेच्या मूल्यांचा, तत्त्वांचा प्रभावही दिसून येतो. कायदेपंडितांनी एकमतांच्या ज्या ज्या तरतुदींचा समावेश आपल्या राज्यघटनेत केला त्यापैकी एका

Scanned by CamScanner

आजही भारतीय जनता मोठ्या प्रमाणात निरक्षर आहे. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. मग इथे असा प्रश्न उपस्थित होतो की, अन्न आणि शिक्षणापासून वंचित असणाऱ्या व्यक्तींना खऱ्या अर्थाने सार्वभौम अस्तित्व आहे काय? संसदीय लोकशाही आणि स्वतंत्र न्यायपालिकाही वंचितांच्या बाजूने उभी आहे का? आणि आता तर संविधानातील मार्गदर्शक तत्त्वही इतिहासजमा होत आहेत, तेव्हा संविधानातील उदारमतवादी पैलूंकडे स्वतः लक्ष वेधणे आवश्यक आहे.

तरतुदीचा वापर करून इंदिरा गांधी यांनी भविष्यात आणीबाणी घोषित केली. काश्मीर व ईशान्य भारतात लष्करी दलांचा सुलभपणे वावरही सुरू झाला. याचबरोबर भारतीय न्यायव्यवस्था अशा घटनांचा मागोवासुद्धा घेत असते. यामुळेच भारतीय राज्यघटना एक उत्तम व ऐतिहासिक दस्तऐवज आहे ते केवळ घटनाकारांमुळे नाहीतर राज्यघटनेच्या तत्त्वांची व मूल्यांची अंमलबजावणी करणारी शासनयंत्रणा – कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळही – तेवढीच महत्त्वाची आहे.

भारतीय राज्यघटनेचा सरनामा

घटनेच्या मूळ सरनाम्यात 'सार्वभौम, लोकशाही, गणराज्य' या शब्दाचा उल्लेख होता. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीने 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य' असा बदल घटनेच्या सरनाम्यात करण्यात आला. राज्यघटनेच्या सरनाम्याची सुरुवातच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांपासूनच होते. म्हणजेच याचा अर्थ असा आहे की, भारतीय जनता ही सार्वभौम असून ही राज्यघटना स्वतः भारतीय जनतेने स्वीकारली आहे. भारतीय राज्यघटनेची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. पाश्चात्त्य राष्ट्रांत ज्यावेळी लोकशाही शासनव्यवस्था अवतरत होती त्यावेळी स्त्रिया व वंचितांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकारापासून दूर ठेवले होते. परंतु भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच स्त्रियांना व वंचितांना सार्वत्रिक मताधिकार दिला. तसेच राज्यघटनेने अस्पृश्यतेचे केवळ उच्चाटन केले नाही तर वंचित जातींच्या गटांचा समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतले.

फ्रेंच राज्यक्रांतीपासून सर्वश्रुत असणारी स्वातंत्र्य, समता व बंधुता ह्या तिन्ही मानवी मूल्यांचा स्वीकार भारतीय राज्यघटनेने केला आहे. 'समता' म्हणजे 'दर्जा व संधीची समानता' होय. तर 'बंधुता' म्हणजे 'व्यक्तीची प्रतिष्ठा व देशाची अखंडता' होय. म्हणजेच बंधुता ही देशातील विभिन्न धर्मांच्या लोकांमध्ये भावनिक बंध निर्माण करते व देशाची अखंडताही शाबूत ठेवते. अंततः भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याकडे वळून पाहताना 'सार्वभौमत्व' या संकल्पनेचा चिकित्सक विचार करणे आवश्यक ठरते.

सार्वभौम भारतीय जनता

भारतीय स्वातंत्र्यलढ्याने वासाहतिक एकसूत्री ब्रिटिशांची राजवट उलथवून भारत एक गणराज्य/प्रजासत्ताक राष्ट्र बनले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार भारतीय जनतेला मिळाला याचा अर्थ असा आहे की, भारतीय जनता ही सर्वोच्च स्थानी आहे व सार्वभौम आहे. देश हा प्रजासत्ताक राष्ट्र असणे व सार्वभौम असणे हे केवळ पुरेसे नाही तर बाह्य शक्तींपासून देशाचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य टिकवणे अधिक महत्त्वाचे असते. भारताला अशावेळी स्वातंत्र्य मिळाले ज्यावेळी आशिया व आफ्रिका खंडांतून वासाहतिक राजवट संपुष्टात येत होती आणि जागतिक भांडवली साम्राज्यवाद नव्या स्वरूपात पुढे येत होते. वर्तमानकाळात अमेरिका वसाहती निर्माण न करता चातुर्याने आपले साम्राज्यवादी धोरण प्रस्थापित करू पाहत आहे. असे साम्राज्यवादी धोरण राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळींना व जी समाजवादी राष्ट्रे पाश्चात्त्य भांडवली राष्ट्रांच्या तुलनेने आर्थिक, तंत्रज्ञानात्मक व लष्करीदृष्ट्या कमकुवत आहेत अशा राष्ट्रांसमोर निश्चितच आव्हाने उभी ठाकली आहेत. अशा संदिग्ध (विसंगत) जागतिक राज्यवस्थेत भारताचे स्थान काय होते?

भारत आणि जग

पंडित नेहरू हे स्वतंत्र विचारांचे पुरस्कर्ते असल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या लष्करी आघाड्यांपासून दूर राहात त्यांनी देशाच्या हिताचे संरक्षण करणारे धोरण आखले. नंतर पुढे त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत 'समाजवादी मॉडेल'चा प्रयोग केला. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आखलेल्या धोरणांमुळे पाश्चात्त्य राष्ट्र आणि भारत यांच्यात एकप्रकारे मैत्रीचा बंध निर्माण झाला. यामुळेच भारताचा ब्रिटिशांच्या 'राष्ट्रकुला'त प्रवेश झाला. देशाला आर्थिक व तंत्रज्ञानात्मक सहाय्य मिळविण्यासाठी अमेरिकेसोबत चांगले संबंध निर्माण केले गेले. नेहरूंच्या या

Scanned by CamScanner

प्रयत्नांना प्रोत्साहन मिळत गेल्यामुळे ते सोव्हिएत राष्ट्राच्या अधिकच जवळ गेले व त्यांची ही सुप्त इच्छाही होती.

याच वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेने साम्यवादी राष्ट्रांच्या विरुद्ध शीतयुद्ध पुकारले होते. नाटो, बगदाद करारसारखे आघाड्या तयार करून अमेरिकेने साम्यवादी राष्ट्रांच्या विरुद्ध लष्करी आव्हान उभे केले. या पार्श्वभूमीवर नेहरूंनी देशात आखलेल्या मिश्र आर्थिक धोरणांकडे संशयाच्या दृष्टीने पाहिले जात होते. यामुळे नेहरूंनी पुढे केलेला मैत्रीचा हातही अमेरिकेकडून नाकारण्यात आला. परिणामतः नेहरूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले आणि देशाच्या तंत्रज्ञानात्मक व आर्थिक सहाय्यासाठी सोव्हिएत संघासोबत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण आखले. याच वेळी नेहरू तेलंगणा ते केरळमधील कम्युनिस्टांच्या विरोधातही त्याच जोमाने उभे राहिले. यावेळी भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध वैश्विक मुद्द्यांवर स्वतंत्र भूमिका घेत होता. क्युबाच्या क्रांतिकारी चळवळीचे स्वागत करत होता. नासिर, सुकार्नो, गमल अब्दुल, पॅट्रीस लुमुम्बा, मॅकरिअस आणि मार्शल टिटोसारख्या स्वतंत्र विचारांच्या नेत्यांशी घनिष्ठ संबंध निर्माण करत होता व एकीकडे भारताने जगातील दोन महाशक्तींपासून समांतर अंतर ठेवून अलिप्ततावादी भूमिकांचा स्वीकार करत होता. अशाच काळात १९६२ च्या भारत–चीन युद्धाचे निमित्त साधून अमेरिकेने भारताशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. भारतात साठच्या दशकाच्या मध्यात निर्माण झालेल्या पेचप्रसंगामुळे भारतीय रुपयाचे अवमूल्यन करण्याच्या अमेरिकी दबावाला श्रीमती इंदिरा गांधींचे सरकार बळी पडले. भारतातील हरितक्रांतीमुळे अमेरिकेने कृषिधोरणाच्या सहाय्याने आपली आर्थिक नीती रुजविण्यासाठी अवकाश मिळाला.

देशातील संरचनात्मक बदलांशिवाय परराष्ट्र धोरणातील स्वतःच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण भारत टिकवू शकला असता काय, असा प्रश्न या निमित्ताने इथे उपस्थित होतो. एकीकडे भारतात निव्वळ एका टोकाला तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षणाचा पल्ला गाठला जात होता आणि दुसऱ्या टोकाला भारतातील निरक्षरता व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची शोचनीय अवस्था होती. एका टप्प्यावर भारतात उदारीकरण, खाजगीकरणाच्या प्रक्रियेने भारताला 'विकसित होण्याचे' व 'महासत्ता' होण्याचे मृगजळ दाखविले. आजही भारतीय जनता मोठ्या प्रमाणात निरक्षर आहे. दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. मग इथे असा प्रश्न उपस्थित होतो की, अन्न आणि शिक्षणापासून वंचित असणाऱ्या व्यक्तींना खऱ्या अर्थाने सार्वभौम अस्तित्व आहे काय? संसदीय लोकशाही आणि स्वतंत्र न्यायपालिकाही वंचितांच्या बाजूने उभी आहे का? आणि आता तर संविधानातील मार्गदर्शक तत्त्वही इतिहासजमा होत आहेत, तेव्हा संविधानातील उदारमतवादी पैलूंकडे स्वतः लक्ष वेधणे आवश्यक आहे.

भारतातील शेतकरी, काम करणाऱ्या वर्गाचे सार्वभौमत्व हे साम्राज्यवादी धोरणांशी जोडले गेले होते. नेहरूयुगात मोठ्या प्रमाणात क्रांतिकारी बदल घडून आले नाहीत. गरीब, कामगारांच्या सशक्तीकरणासाठी व्यापक पाऊल उचलले गेले नाही. हे केवळ 'लोक सार्वभौमत्व' या आधारावर घडणे शक्य होते. यामुळे देशात साम्राज्यवादी धोरण कायमस्वरूपी थांबवले गेले नाही तर ते धोरण केवळ पुढे ढकलले गेले. विसाव्या शतकात भारतात जी नवउदारमतवादी धोरणे उद्‌भवली ती तार्किकदृष्ट्या पूर्वीच्या काळातील अपयशाचे फलित म्हणून. अशा भांडवली आर्थिक धोरणांचा प्रभाव देशाच्या परराष्ट्र धोरणांवरही पडू लागला. परिणामतः आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत दोन अक्षांचा भाग बनला. एकीकडे भारत–अमेरिका–इस्राईल तर दुसऱ्या बाजूला विकसनशील भारत–अमेरिका–जपान–ऑस्ट्रेलिया असे अक्ष तयार झाले आहेत आणि जेव्हा हे अक्ष पूर्ण आकार घेतील त्या क्षणी भारत एकेकाळी काय होता व काय बनू शकला असता याचे केवळ स्मरणरंजन करण्याची वेळ येईल.

(एजाज अहमद यांचा मूळ लेख फ्रंटलाईनमध्ये १३ फेब्रुवारी २०११ मध्ये प्रसिद्ध झाला असून त्याचे संक्षिप्त रूपांतर केदार देशमुख, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ यांनी केले आहे.)

वाटसरूचा बदललेला पत्ता आपल्याकडे नोंदवा.

द्वारा द युनिक अ‍ॅकॅडमी, वास्तू चेंबर्स, शिरोळे रोड, फर्गसन कॉलेजसमोर, शिवाजीनगर, पुणे ४११००४.
दू. ०२०–२५५३०९५०. भ्र. ९८६९४८०१६२

Scanned by CamScanner